# १३ आपली सुरक्षा, आपले उपाय!

BBJYR7

## वाचा. समजून घ्या.

दीपा घाबरीघुबरी होऊन धावतपळतच घरात शिरली. तिने आईला घट्ट मिठी मारली अन् म्हणाली, ''आई शेजारच्या गल्लीतल्या एका काकूंच्या घरात गॅसच्या टाकीचा स्फोट झाला. सगळे लोक त्या घराच्या दिशेने धावत होते. घरात नुसता जाळ दिसत होता. लोक पाण्याच्या बादल्या, मातीची घमेली नेत होते. एका काकांनी गाडी काढली अन् काकूंना दवाखान्यात नेले. आई, त्या काकू बऱ्या होतील ना गं?'' एका दमात दीपाने पाहिलेले दृश्य आईला सांगितले. हे सगळे पाहून ती खूप घाबरली होती.

आई तिला म्हणाली, ''बाळ, त्या काकू नक्कीच बऱ्या होतील. त्यांना नेलंय ना दवाखान्यात. अगं, आता वैद्यकीय क्षेत्रात खूप प्रगती झाली आहे. नवनवीन औषधं, नवनव्या तंत्रज्ञानांचा वापर सुरू झाला आहे. तू घाबरून जाऊ नकोस.'' तरीही दीपाच्या मनात अनेक प्रश्न होते.



## सांगा. चर्चा करा.

१. दीपाने पाहिला तसा प्रसंग तुम्ही कधी पाहिला आहे का?
२. गॅसच्या टाकीचा स्फोट झाला म्हणजे नेमके काय झाले?
३. लोक पाण्याच्या बादल्या, मातीची घमेली का नेत होते?



## विचार करा. सांगा

**खालील विद्युत उपकरणे वापरताना तुम्ही कोणती काळजी घ्याल?**

१. इस्त्री २. गिझर ३. मोबाईल

- **शिक्षक व पालक यांच्या मदतीने समजून घ्या.**

१. घरात आग कशाकशामुळे लागू शकते?
२. आपल्या हातावर वाफ आली किंवा हाताला चटका बसला तर आपण हात पाण्याखाली का धरावा?
३. रेल्वेस्थानक, एस.टी. स्थानक अशा गर्दीच्या ठिकाणी वाळूच्या बादल्या भरून ठेवलेल्या दिसतात. त्या कशासाठी असतात?
४. अग्निशमन यंत्र कुठे कुठे बसवलेले तुम्ही पाहिले आहे? त्या ठिकाणी ते का बसवलेले असते?
५. गावाहून आल्यावर अगोदर घराची दारे-खिडक्या उघडाव्यात व नंतर विद्युत दिवा लावावा, असे का?

- **चित्रांचे निरीक्षण करा. वाचा.**




अंघोळीला जाताना अगोदर गिझरचे बटण बंद करावे व नंतर गिझरचे गरम पाणी सोडावे. वीज प्रवाहित होताना काही अडथळा आला, तर वीजप्रवाह पाण्यात प्रवाहित होऊ शकतो व विजेचा झटका बसू शकतो.




लग्न, कौटुंबिक समारंभ वा इतर सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये विजेची अनावश्यक रोशणाई टाळावी. रोशणाईसाठी लावलेल्या दिव्यातून वीजप्रवाह प्रवाहित होताना जर काही अडथळा आला तर आग लागण्याची शक्यता असते.



सतरंजी, कारपेट, गालिचा यांखालून विजेची वायर जाऊ देऊ नये, कारण जर त्या आच्छादित वायरीच्या भागात वायर खराब झाली तर वीजप्रवाह प्रवाहित होताना अडथळा येऊन आग लागू शकते.



विजेच्या एकाच बोर्डवर विजेवर चालणारी अनेक साधने व त्यांचे प्लग लावू नयेत. वीज प्रवाहावर दाब येऊन आग लागू शकते.

- **लक्षात ठेवा.**

१. खिडक्यांच्या पडद्याजवळ पेटती मेणबत्ती, उदबत्ती वा इतर गोष्टी ठेवू नयेत.
२. आगीमुळे घरात खूप धूर झाला असेल तर घरातून रांगत रांगत बाहेर पडावे.
३. विद्युत उपकरणांचा वापर करून झाल्यावर विद्युत बटण त्वरित बंद करावे.





रात्री झोपताना वा घराबाहेर जाताना विजेचे दिवे वा इतर उपकरणे बंद ठेवावीत. त्यामुळे विजेची बचत होते.

घरातील लॅम्पशेडवर वा बल्बवर एखादा रुमाल वाळत घातला, बल्ब खूप गरम झाला, तर तो वाळत घातलेला रुमाल पेट घेऊ शकतो.





विद्युत मंडळाच्या डिपीतून अनेक घरांमध्ये वीज प्रवाह प्रवाहित केलेला असतो. त्या डिपीमध्ये वायरींचे जाळे दिसते. या डिपीपासून दूर राहावे. त्या वायरींना हात लावू नये.

स्वयंपाकाची शेगडी, स्टोव्हजवळ जळाऊ वस्तू ठेवू नये. उदा., कपडे, काचेच्या वस्तू, लाकडाच्या वस्तू, कागद.

- **दक्षता घेऊया.**

१. मोबाईल चार्जिंगला लावलेला असताना फोन आला तर चार्जिंग बंद करून फोन घेणे.
२. लायटर, काडेपेटी यांच्याशी न खेळणे.
३. विद्युत वायर किंवा विद्युत तारेवर वजन पडणार नाही हे पाहणे.
४. जुन्या, कुरतडलेल्या विजेच्या वायरी वेळीच बदलाव्यात.



## वाचा.

### अग्निशमन सेवा




कोठेही आग लागली तर एक लाल रंगाची गाडी जोरजोरात घंटा वाजवत आगीच्या ठिकाणी येते. त्यातील कर्मचारी पाण्याच्या मोठमोठ्या नळकांड्या घेऊन आग आटोक्यात आणतात. आग विझवतात. या दलातील कर्मचाऱ्यांच्या हालचाली खूप वेगवान व शिस्तबद्ध असतात. आग विझवण्याचे हे प्रात्यक्षिक बघण्यासारखे असते.



आग लागणे, घर पडणे, झाड पडणे, मोठा अपघात होणे अशा आपत्कालीन परिस्थितीतून आपल्याला बाहेर काढण्याचे काम अग्निशमन दल करते. या दलास पाचारण करण्यासाठी १०१ या करमुक्त दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधतात व आपत्कालीन घटना घडलेल्या ठिकाणचा पत्ता व थोडक्यात तपशील देतात. अग्निशमन दल घटनास्थळी तात्काळ पोहोचते. आपल्याला मदत करण्यासाठी आलेल्या या दलास आपण सहकार्य केले पाहिजे. ते देत असलेल्या सूचनांनुसार वागले पाहिजे. त्यांच्या कामात व्यत्यय येणार नाही असे आवर्जून पाहिले पाहिजे; कारण अग्निशमन दल आपले मित्र आहे.

- **खालील उतारा वाचा. विरामचिन्हांचा योग्य वापर करून उतारा पुन्हा लिहा.**

शाळा सुरू होऊन चार दिवस लोटले अभ्यासक्रम शिकवायला सुरू करण्याअगोदर भगतसर वर्गातील मुलांना स्वच्छतेचे नियमित शाळेत येण्याचे अभ्यासाचे महत्त्व सांगत होते मागील बाकावर बसलेल्या मुलांची चुळबुळ सुरू झाली तेव्हा सरांनी विचारले शंकर काय चालले तुमचे मागे शंकर उठून उभा राहिला व म्हणाला सर बाहेरून कसलीतरी दुर्गंधी येतेय वर्गातील बोलका व अतिउत्साही विशाल लगेच खिडकीच्याबाहेर डोकावून पाहत म्हणाला काही नाही हो सर बाहेर नाला साफ करणारे आले आहेत त्याचा वास येतोय वर्गातील अनेकांनी नाकं दाबून धरली काहींच्या तोंडून शी असे शब्द बाहेर पडले भगतसर आताच स्वच्छतेचे महत्त्व सांगत होते व मुलांच्या अशा प्रतिक्रिया पाहून त्यांना वाईट वाटले सर म्हणाले मुलांनो आता पावसाळा सुरू होणार आहे तेव्हा पाण्याने नाल्या तुंबू नयेत म्हणून ते नाल्या साफ करायला आले आहेत आणि तुम्हांला नाक मुरडायला काय झाले

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना वीज व अग्नी यांपासून सुरक्षित राहण्यासाठी मार्गदर्शन करावे.